मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्र.४४६/२०१२ प्रकरणी दि.२.२.२०१६ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड यांना नुकसान भरपाई देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-२०१८/प्र.क्र.१००/र-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १५/०७/२०१९

<u>वाचा :-</u> (१) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्र.४४६/२०१२ प्रकरणी दि.२.२.२०१६ रोजी दिलेले आदेश.

(२) जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्र क्र.२०११/मशाका/डेस्क-२/नैआ/सिआर-, दि.२०.३.२०१६

(३) जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्र क्र.२०११/मशाका/डेस्क-२/नैआ/सिआर-, दि.२४.८.२०१८

<u>प्रस्तावना -</u>

सन २००५ साली झालेल्या अतिवृष्टीमध्ये, अभिनव भारत शिक्षण संस्था संचालित नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या इमारतीचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गुजरात सरकारकडून महाराष्ट्र शासनाला प्राप्त निधीमधून अनुदानाची मागणी संस्थेने केली होती. परंतु न मिळाल्याबाबत संस्थेने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४४६/२०१२ दाखल केले होते. सदर न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२.२.२०१६ रोजी अंतिम आदेश दिले आहेत. सदर आदेशास अनुसरुन, अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड या संस्थेस रुपये १.०० कोटी निधी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्र.४४६/२०१२ प्रकरणी दि.२.२.२०१६ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन, अभिनव भारत शिक्षण संस्था, नांदेड या संस्थेस रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) निधी अदा करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडे शिल्लक असलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून जिल्हाधिकारी, नांदेड यांना रुपये १.०० कोटी रक्कम आहरित करुन धनादेशाद्वारे/ आरटीजीएसद्वारे अदा करण्याची कार्यवाही लेखाधिकारी (आव्यप्र-६), महसूल व वन विभाग यांनी करावी. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी संबंधित संस्थेस निधी प्रदान करण्याची कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१५१४४३१८४८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2019.07.15 14:51:45 +05'30'

(द.शं.मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,नागपूर-२
२. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२
३. जिल्हाधिकारी, नांदेड
४. वित्तीय सल्लागार व सह सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. लेखाधिकारी (आव्यप्र-६), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अभिनव भारत शिक्षण संस्था, तारासिंह मार्केट, वजीराबाद, नांदेड
७. वित्त विभाग कार्यासन व्यय-९/अर्थसंकल्प-६, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

***